# रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेज

SERVE TO CHANGE LIVES

संपादक :
रो. प्रमोद गुगळे
कमिटी सभासद
रो. विनय वाघ
रो. जयंत कुलकर्णी

अंक तिसरा, सप्टेंबर २०२१

प्रांतपाल २०२१-२०२२
रो. पंकज शहा
अध्यक्ष : रो. विनायक पेठे
सचिव : रो. हर्षदा बावनकर

## Presidential



नमस्कार मित्रहो,

ह्या वर्षातील चक्क तीन महिने पार पडले आहेत, सर्व टिम्स चे जोरदार काम सुरू झाले आहे. आपल्या युथ टीम तर्फे नुमवी मुलींची शाळा येथे इन्ट्रॅक्ट क्लब चे इन्स्टॉलेशन खूप छान पद्धतीने झाले. आयपीपी विनय नेवसे ह्याने इंट्रॅक्ट क्लब च्या मुलींना एक सुंदर असा टास्क पण दिला आहे . आता लवकरच आपण भिवरी येथील शाळेतील इन्ट्रॅक्ट क्लब चे पण उदघाटन करणार आहोत. त्याचबरोबर लिटरसी टीमतर्फे शालेय विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची आवड आणि त्यातून वक्तिमत्व विकास होण्यासाठी मदत म्हणून आपण पुस्तकांचा संच शाळांना देणार आहोत. सदर संच रू. २०००/- ला असून ह्यात १० पुस्तके आहेत.असे संच आपण ग्रामीण भागातील इतर शाळांमधून देखील देणार आहोत. आपल्या व्होकेशनल टीमतर्फे दोन लेक्चर्स देण्यात आली भिवरी येथील शाळेत केमिस्ट्री साठी लॅबोरेटरी ओट्याचे काम आपण करून देत आहोत . त्याच बरोबर पठार वाडी येथील छोट्या मुलांच्या शाळेच्या सीमा भिंती चे काम पावसाळा संपला की पुढील महिन्यात सुरू होईल. मित्रहो, आपला सिग्नेचर प्रॉजेक्ट महादान आपण ठरविल्या प्रमाणे दणक्यात सुरू झाला आहे. आत्ता पर्यंत स्नेह परेडाईज , सन ऑरबीट , सुंदर संकुल अशा तीन सोसायट्यांमधून सुरू झाला आहे. खूप चांगला रिस्पॉन्स आपल्याला मिळत आहे. सर्व महादान टीमचे अभिनंदन, आत्ता पर्यंत जमा झालेले सर्व धान्य व कपडे मातोश्री वृद्धाश्रम ह्या संस्थेला देण्यात आले आहे. तसेच रोख रक्कम आपण आपल्या विविध प्रोजेक्ट साठी वापरणार आहोत. ससून हॉस्पिटलमधील बालरुग्ण विभागात लॅप्रोस्कोपी युनिट अद्यावत करण्यात येणार आहे. कोकण येथील महापुरात हानी पोहोचलेल्या शाळांमधून विविध प्रकारची मदत करण्यात येणार आहे. भारत विकास परिषद च्या मदतीने दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव प्रदान करण्यात येणार आहेत. ह्याचबरोबर आपल्या पी आय टीमने देखील आपल्या सर्वच प्रोजेक्टची पब्लिसिटी खूप उत्तम पद्धतीने केली आहे. विविध लोकल न्यूजपेपर मधून उत्तम अशी मुद्देसूद बातमी छापून येत आहे त्याबद्दल पी आय टीमचे देखील अभिनंदन. आता पुढील आठवड्यात अनेक सोसायट्यांमधून आपण हा प्रोजेक्ट करत आहोत. तेंव्हा सर्वजण जोमाने काम करूया, धन्यवाद.

**रो. विनायक पेठे**

## ROTARY INTERNATIONAL CONVENTIONS

Rotary International Convention is a global network of 1.2 million neighbors, friends, leaders, and problem-solvers who see a world where people unite and take action to create lasting change – across the globe, in our communities, and in ourselves. It work together to Promote peace, Fight disease, Provide clean water, sanitation, and hygiene, Save mothers and children, and Support education & Environment.""Every year on June month Rotary International holds a worldwide convention "to stimulate, inspire and inform all Rotarians at an international level."'The convention, which may not be held in the same country for more than two consecutive years, is the annual meeting to conduct the business of the association."The planning process usually begins about four or five years in advance."The RI board determines a general location and invites cities to make proposals.""The conventions are truly international events which 20,000 to 40,000 Rotarians and guests attend.""All members should plan to participate in a Rotary International convention to discover the real internationality of Rotary."It is an experience you'll never forget.

For 2022 Rotary Convention registration -https://convention.rotary.org/en

**From International Director Yogesh Naik**



# संपादकीय

ऐसी देनी देन जू - कित सीखे हो सैन।
ज्यों-ज्यों कर ऊँचे करो, त्यों-त्यों नीचे नैन।।

संत कबीर म्हणतात 'रहीम, तू जेंव्हा लोकांना मदत करतोस तेंव्हा तुझे हात नेहमी वर असतात पण तुझी नजर खाली जमीनी कडे असते, असे का?'

त्यावर रहीम उत्तर देतात

देनहार कोई और है, देवत है दिन रैन।
लोग भरम हम पर करें, याते नीचे नैन।।

'देणारा तर देव आहे, त्याने हे सर्व मला दिले आहे, मी तर निमित्तमात्र आहे, पण लोकांना वाटते की मी देतोय, त्यामुळे माझी नजर आपोआप खाली जाते.'

आपल्या महादान अभियानाच्या निमित्ताने वरील सुंदर दोह्यांची मला आठवण झाली. आपण देणारे, पण निमित्त आहोत, हे खरे.

मित्रांनो, पुन्हा एकदा आपल्या सर्वांचे या पत्राद्वारे स्वागत व अभिनंदन ! अभिनंदन यासाठी की महादानाच्या या आगळ्या वेगळ्या प्रोजेक्टद्वारे आपण एक बहुमूल्य कार्य करीत आहोत. समाजाचा शाश्वत विकास जसा शिक्षणाने होतो तेवढाच महत्त्वाचा सेवाभाव आहे ! या सेवाभावामुळे आपल्या समाजातील अनास्था व गरिबी कमी होऊन आनंद व नैतिकतेची उभारणी होत राहील.

मित्रांनो, आपणाकडे पोहोचण्याचे काम या पत्राद्वारे शक्य होत आहे व त्या कामात मला अनेकजण मदत करत आहेत. आपण सर्वजण आपले विचार, आपल्या कार्याची माहिती, साहित्य पाठवीत रहा व हे पत्र वाचनीय बनण्यास मदत करा ही विनंती, पण त्यासाठी कृपया लिहिते व्हा.

सर्वांना सप्रेम नमस्कार !

**रो. प्रमोद गुगळे**

## साप्ताहिक कार्यक्रम

नमस्कार मंडळी, मागील महिन्यात २० ऑगस्टला रोटरी क्लब ऑफ शिवाजीनगरच्या रेश्मा कुलकर्णी यांचा Japan Calling हा जपानच्या विविधतेची माहिती सांगणारा कार्यक्रम झाला.

२१ ऑगस्टला आहारतज्ञ डॉ. चंद्रकांत कणसे यांनी 'डाएट- काही समज आणि गैरसमज' हा नावाला साजेसा कार्यक्रम झाला.

३ सप्टेंबर रोजी रोटरी क्लब ऑफ पाषाणमधील डॉ. सुचित्रा कुलकर्णींनी 'किस्से वधु-वर संशोधनाचे' हा बहारदार कार्यक्रम केला.

४ सप्टेंबरला 'डॉक्टर तुमच्या भेटीला' या मध्ये प्रकाश पेठे, श्रीराम पेंडसे व प्रतिमा कुलकर्णी या तिघांनी मिळून 'स्वास्थ्याकडून सुखाकडे- ॲक्युप्रेशरच्या माध्यमातून' हा विषय मांडला.

१० सप्टेंबरला आपल्या सगळ्यांच्या घरी गणपती बाप्पांचे आगमन झाले असल्याने क्लबला सुट्टीच होती.

**रो. सुनीता ओगले**
प्रोग्रॅम कमिटी चेअरपर्सन

## पुढील महिन्यातील कार्यक्रम

| | |
|---|---|
| १ ऑक्टोबर - | रो. विनय वाघ यांचे महाभारतावर व्याख्यान |
| ८ ऑक्टोबर - | भोंडला |
| १५ ऑक्टोबर - | दसरा व कोजागिरीनिमित्त सुट्टी |
| २२ ऑक्टोबर- | महादानातील सहभागानिमित्त कार्यकर्त्यांचे फेलिसिटेशन |

# फॅमिली इन रोटरी





नमस्कार मंडळी,

फॅमिली इन रोटरीचा ह्या वर्षामधील पहिला कार्यक्रम २९ ऑगस्टला झाला. सर्व प्रथम आपल्या क्लबमध्ये जे दोन नवीन सदस्य १)श्याम प्रसाद पोंक्षे आणि २) दिलीप भाब्रा सामिल झाले आहेत. त्यांना रोटरीची पिन प्रदान करून त्यांचे आपल्या हेरिटेज क्लबमध्ये स्वागत करण्यात आले. दिलीप भाब्रा यांनी त्या दिवशी क्लबला २५००० रु.ची देणगी दिली.

त्या नंतर मंदार परळीकर आणि सहकारी यांनी जागरण गोंधळ हा कार्यक्रम अतिशय छान सादर केला. एक तास चाललेल्या ह्या कार्यक्रमची सांगता देवीला सर्व संकटे दूर होऊन पुन्हा जनजीवन सुरळीत सुरू हो दे अशी प्रार्थना करून झाली.

त्या नंतर मधुमिता बर्वे व सचिन हनमघर यांनी सप्टेंबर महिन्यात घेण्यात येणाऱ्या महादान ह्या कार्यक्रमाची माहिती सर्वांना दिली. सर्व सदस्यांनी जास्तीत जास्त ह्याचा प्रचार करावा असे सांगितले.

आपला कार्यक्रम बघण्यासाठी आपल्या सभासदांचे नातेवाईक आवर्जून उपस्थित राहिले होते. दिलीप भाब्रा आणि श्याम प्रसाद पोंक्षे यांच्या हस्ते ऑगस्ट महिन्याचे बुलेटिन प्रकशित केले गेले. प्रेसिडेंट विनायक याने सर्वांचे आभार मानून भोजनाचा आस्वाद घेण्यास सांगून कार्यक्रम संपला.

**अनुजा बापट**

# भावविश्व शब्दांचे

सजण दारी उभा, काय आता करू ?
घर कधी आवरू, मज कधी सावरू ?

प्रसिध्द कवी, मराठी गझलसम्राट सुरेश भट यांची ही अत्यंत सुंदर गझल....मी पहिल्यांदा ऐकली ती माझी भाची मयुरा हिच्याकडून... तिच्या लग्नात, सीमंती पूजनाला तिने हे गाणे अतिशय सुंदर म्हंटले...तिच्या भावनिक विश्वात हेच चालते असणार... त्यामुळे अतिशय भावपूर्ण वाटले आणि मनाला भिडले... अर्थातच मी यथावकाश गाण्याची माहिती पण मिळवलीच...पण मनात आणि कानात अगदी कायमस्वरूपी छाप पाडली आहे या गाण्याने....

सुरेश भट हे खरंच अतिशय सुंदर पद्धतीने त्यांच्या कवितांमधून संपूर्ण भावविश्व डोळ्यासमोर आणतात. माहितीजालावर मला भारती आचरेकर यांच्या आवाजात पण हे गाणे ऐकायला मिळाले.. त्यांनी पहिले आणि शेवटचे कडवे गायले आणि मधल्या ओळी मात्र सुन्दर रितीने वाचल्या आहेत...यशवंत देव यांनी संगीत दिले असेही वाचनात आले.... सलील कुलकर्णी आणि आर्या आंबेकर यांच्या अल्बम मध्ये पण हे गाणे अतिशय सुंदर आणि वेगळ्या पदधतीने केले आहे. कोणतेही तालवाद्य न वापरता जसेच्या तसे शब्द रसिकांच्या पर्यंत पोहोचवण्याचा अप्रतिम अविष्कार!!! खरंच मी मंत्रमुग्ध झाले अगदी....पुन्हा पुन्हा ऐकत राहवेसे वाटते हे गाणे/ ही गझल-ङ

कोणतीही कविता ही एकदा वाचली की पूर्ण कधीच कळत नाही.....प्रत्येक वेळेस वाचताना कवीने तिला घडवताना योजलेले पैलू नव्यानेच उलगडत जातात.. आणि कोणी जर ते आपल्यासमोर उलगडले तर सोने पे सुहागाच!! पहिल्यांदा खरं तर मला ही गझल एका नवीनच प्रेमात असलेल्या प्रेमिकेने म्हंटली आहे असे वाटले होते...तिचा प्रियकर घरी येतोय आणि काय करू अन काय नाही अशी तिची विचित्र अवस्था झाली आहे असे वाटते. तिची घालमेल पहिल्या कडव्यात अगदी स्पष्ट जाणवते.....

हे एखादे प्रणयप्रधान काव्य असावे असे वाटते.आपण एखाद्या गोष्टीची खूप काळापासून वाट बघत असतो आणि मग ती गोष्ट जेव्हा आपल्याला खरोखर मिळणार असते तेव्हा आपले मन अगदी असेच होते...संदिग्ध!! खरंच हे असेच घडत आहे ना...कशी मी त्याचा स्वीकार करू? अशा भावना सुद्धा माझ्या मनात ही कविता वाचताना आल्या..प्रियेला सगळं काही आवरून, तयार होऊन त्याच्यासमोर जायचंय... तिची लगबग शब्दातही जाणवतेय...

पण पुढचे कडवे वाचताना मात्र...काही वेगळेच चित्र डोळ्यासमोर येते...

मी न दुबळी कुडी अजून श्रृंगारिली,
मी न सगळीच ही आसवे माळली 'फ
प्राणपूजा न मी अजूनही बांधली,
काय दारातुनी परत मागे फिरू ?

अचानक एका विरहिणीच्या मनातली व्यथा या कडव्यात जाणवतेय... खूप काळापासून ती तिच्या त्या व्यक्तीची वाट बघत आहे आतुरतेने.... आसवांची माळ, दुबळी कुडी...या शब्दात तिचे दुःख जाणवते.कदाचित इथे ती देवालाच(त्यालाच सजण) दर्शन देण्यासाठी बोलावत आहे... म्हणजे तो आपल्याला न्यायला आलाय, खरे तर आपणच बोलावत होतो पण खरंच मनाची तयारी झाली आहे का जाण्याची...आपण सगळ्या या मोहजालातून मुक्त झालो आहोत का ? इतका सहज भेटेल का परमेश्वर आपल्याला ? ? म्हणूनच दारातून परत मागे कशी फिरू ? ? असेही ती विचार करतेय.

तिसऱ्या कडव्यात पुन्हा दरवाज्या वर थाप आली म्हणजे परत कोणीतरी साद देतंय,जन्मोजन्मीचे हे नाते आहे. ओळख जुनीच पुन्हा नव्याने होतेय... राधा आणि श्रीरंगाची...हृदय माझें कसे मीच हृदयी धरू? ...किती सुंदर कल्पना आहे....त्याचे आणि तिचे नाते ....अगदी सहज तिन्ही वेगवेगळ्या परिस्थितीची चित्र डोळ्यासमोर येतात आणि पुन्हा नव्याने एकच गझल वेगवेगळ्या भावनिक विश्वात घेऊन जाते... खूपच वेगळ्या विश्वात गेले मी कवितेचे रसग्रहण करता करता....

सलील कुलकर्णी यांनी एका व्हीडिओ मध्ये हा सगळा उलगडा केलाय.... त्यांचे त्या व्हीडिओ मधील एक वाक्य मला खूप आवडले... एखादी कविता, व्यक्ती आणि एखादे पुस्तक मला पूर्ण समजले असे म्हणताच येत नाही... दरवेळेस त्याचे वेगळे पैलू लक्षात येतात... म्हणूनच पुन्हा पुन्हा त्यांना भेटणे अगदी जरुरीचे असते.

एखादी गझल,गाणे पुन्हा पुन्हा ऐकणे असे नेहमीच होते...पण ती कविता पुन्हा पुन्हा वाचून तिचा शब्द नि शब्द अनुभवणे हे माझ्या बाबतीत पहिल्यांदाच झाले... म्हणूनच मला कळलेला आणि भावलेला अर्थ इथे मांडण्याचा मी प्रयत्न केलाय... ते ही तो अर्थ मनोमन पटला आहे म्हणूनच!!!

सुज्ञा (रो. सोनाली वैशंपायन)




## Vocational Service avenue-

Guidance workshop on From Campus to Corporate for ICICI Academy Vocational students - Subhro Sen on 28.08.2021

Lecture on Art of Negotiation to PCMC Incubation Centre for start-ups - Vivek Joshi on 09.09.2021.

Preliminary visit to Pune Blind Men's Association Technical Institute, Hadapsar, for checking the possibility of future association of our Club with them on various projects - Subhro Sen and Vijaya Puranik on 16.09.2021

Subro sen




# THE ROTARY FOUNDATION'S BEGINNING

Some magnificent projects grow from very small seeds. The Rotary Foundation had that sort of modest beginning.

In 1917 RI President Arch Klumph told the delegates to the Atlanta Convention that "it seems eminently proper that we should accept endowments for the purpose of doing good in the world."

The response was polite and favorable, but the fund was slow to materialize. A year later the "Rotary Endowment Fund," as it was first labeled, received its first contribution of $26.50 from the Rotary Club of Kansas City, which was the balance of the Kansas City Convention account following the 1918 annual meeting.

Additional small amounts were annually contributed, but after six years it is reported that the endowment fund had only reached $700.

A decade later, The Rotary Foundation was formally established at the 1928 Minneapolis Convention. In the next four years the Foundation fund grew to $50,000. In 1937 a $2 million goal was announced for The Rotary Foundation, but these plans were cut short and abandoned with the outbreak of World War II.

In 1947, upon the death of Paul Harris, a new era opened for the Rotary Foundation as memorial gifts poured in to honor the founder of Rotary. From that time, The Rotary Foundation has been achieving its noble objective of furthering "understanding and friendly relations between peoples of different nations."

By 1954 the Foundation received for the first time a half million dollars in contributions in a single year, and in 1965 a million dollars was received.

It is staggering to imagine that from those humble beginnings, The Rotary Foundation is now receiving more than $85 million each year for educational and humanitarian work around the world. The Rotary Foundation transforms your gifts into service projects that change lives both close to home and around the world.

Since it was founded more than 100 years ago, the Foundation has spent more than $4 billion on life-changing, sustainable projects. With your help, we can make lives better in your community and around the world.

**Our mission**

The Rotary Foundation helps Rotarians to advance world understanding, goodwill, and peace by improving health, providing quality education, improving the environment, and alleviating poverty.

## वाढदिवस शुभेच्छा

**ऑक्टोबर महिना**

| | |
|---|---|
| मिलिंद मुतालिक | २ऑक्टो. |
| माधुरी मराठे | ६ऑक्टो. |
| सुनीता ओगले | १२ ऑक्टो. |
| मृणाल पेठे | १४ ऑक्टो. |
| जयंत कुलकर्णी | १९ ऑक्टो. |
| प्रफुल देशपांडे | १९ ऑक्टो. |
| पुर्वदा बापट | २०ऑक्टो. |
| पूनम महाजन | २०ऑक्टो. |
| विनायक पटवर्धन | २०ऑक्टो. |
| दीपा बारटक्के | २१ऑक्टो. |
| अजित वैशंपायन | २२ऑक्टो. |
| रमेश | २३ऑक्टो. |
| हर्षदा | २४ऑक्टो. |
| विवेक जोशी | २६ऑक्टो. |
| दत्ताजी | २६ऑक्टो. |
| स्वाती मुळे | २८ऑक्टो. |

**नोव्हेंबर महिना**

| | |
|---|---|
| गौरी पेठे | २ नोव्हें |
| उमेश फडके | ५ नोव्हें |
| वृषाली जोशी | १३ नोव्हें |
| आरती आठले | १७ नोव्हें |
| सुरेश नातू | १७ नोव्हें |
| मंजू ओझा | १८ नोव्हें |
| कार्तिकी सराफ | २० नोव्हें |
| तेजश्री हिरवे | २१ नोव्हें |
| उदय पाळंदे | २२ नोव्हें |
| आरती जोशी-आठवले | २३ नोव्हें |
| मृणाल देशपांडे | २५ नोव्हें |
| मीना पटवर्धन | २५ नोव्हें |

## मेरे जीवनसाथी

**लग्न वाढदिवस**

| | |
|---|---|
| प्रतिभा दत्ताजी जायदे | ६ नोव्हें. |
| माधुरी धनंजय मराठे | १५ नोव्हें. |
| सुवर्णा विनोद जाधव | १६ नोव्हें. |
| चारुता विशाल देवपाठक | १८ नोव्हें. |
| सुचित्रा जयवंत शिंत्रे | २१ नोव्हें. |
| आरती माधव आठले | २३ नोव्हें. |
| उदय मंगला फडके | २७ नोव्हें. |
| प्रमोद शीतल गुगळे | २८ नोव्हें. |
| स्वप्ना मिलिंद कानिटकर | २९ नोव्हें. |